जसे प्रकाशाच्या साह्याशिवाय वस्तू दिसत नाही, तसे विचाराशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार ६ मार्च २०२५ | अंक ८७ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007 | All TOURS घर से घर तक दिल से दिल तक | www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# मनोज जरांगे यांनी टाकला नवा डाव, धनंजय मुंडेबाबत आता नवी मागणी; महाराष्ट्राचं लक्ष

## धनंजय मुंडे तुरूंगात जाणार

आरोपींना सांभाळणाऱ्या पोलिसांना सहआरोपी करा. नियती थांबणार नाही. एकना एक दिवस धनंजय मुंडे आतमध्ये जाणार. हे माजोरी लोक आहेत. तुम्हाला आम्ही जेलात घातल्याशिवया राहणार नाही. यांना वाटतं आमचं कोणीच काही करणार नाही. पण तुमचा बाप मनोज जरांगे बसला आहे. तुमच्या अर्ध्या टोळीला तुरुंगात टाकलं. आता तुम्हालाही आत टाकू, असा खणखणीत इशारा जरांगे यांनी दिला.यांच्या टोळीत पोलीस अधिकारी आहे. हे गरिबांची केस घेत नाही. दादागिरी आणि मग्रुरीची सवय लागली आहे. देशमुखांचा खून करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आता आमचा मोर्चा तिकडे वळणार आहे. कचकाच दारववणार आहोत, असे जरांगे पाटील यांनी इशारा दिला.



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर खूनाचे फोटो समोर आल्यानंतर राज्यात असंतोष पसरला. मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी अखेर ८४ दिवसांनी देवेंद्र फडणवीस सरकारने मंजूर केली. मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर तात्काळ मुख्यमंत्र्यांनी तो स्वीकारला. पण हा राजीनामा नेमका कोणत्या कारणावरून दिला, यावरून वाद उफळला आहे. त्यांच्या राजीनाम्यावर विरोधकांचे समाधान झाले नाही. आमदार रोहित पवार असो वा सुरेश धस सर्वांनीच त्यांच्याविरोधात पुन्हा मोर्चा उघडला आहे. त्यातच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुद्धा मोठी म ागणी केली आहे. त्यामुळे मुंडे यांच्या अडचणीत वाढ होण्याची भीती आहे. जरांगे पाटलांचा खणखणीत टोला मुंडेंच्या राजीनाम्याचं स्वागत करायला त्यांनी कुठे राजीनामा दिला, अशी चपराक जरांगे पाटील यांनी लगावली. अजित पवार आणि फडणवीस यांचे आभार त्यांनी मानले. त्यांनी लाथ घालून त्यांना हाकलून दिलं. मुंडेंच्या शासकीय बंगल्यावर खंडणीची मिटिंग झाली. टवाळ पोरांना एकत्र करून त्यांना व्यसनाला लावायचे आणि खंडणी गोळा करायचे. हे अजितदादा आणि फडणवीस यांना माहीत नसायचं, असे जरांगे म्हणाले.

## धनंजय मुंडेंना मुख्य आरोपी करा

लोकं गुन्हे करायचे आणि हे राजकीय गाद्यांवर बसायचे. मुंडे हे ३०२ मध्ये आहेत. त्यांना कमरेत लाथ घालून हाकललं. आता त्याची आमदारकी काढा. त्याला मुख्य आरोपी करा. सह आरोपी करू नका. कारण सर्व कट त्यांनी रचला. त्यांचे लोकं काय करतात हे त्यांना माहीत नाही असं नाही. तो खरमाडे का कोण आरोपी आहे, त्याने आता एकट्याच्या डोक्यावर पाप घेऊ नये. त्याने कुणासाठी काम केलं त्याचं नाव घ्यावं. एकट्याने डोक्यावर पाप घेऊन मरू नका. मुंडेंच्या डोक्यावरही पाप द्या, असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. खरमाडे याच्या कुटुंबीयानेही मुंडेंचं नाव घेतलं पाहिजे. नाही तर तुमचा माणूस मरेल आणि हा इकडे परदेशात फिरेल, त्यामुळे कुटुंबीयांनी मागे हटू नये, असे जरांगे म्हणाले.

# जालन्याच्या त्या तरूणांवरील अत्याचार, पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे घेतली गंभीर दखल

## जिल्हा पोलीस अधीक्षकांशी केली चर्चा ; आरोपींविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश

### अत्याचारित तरूणांच्या प्रकृतीची केली आस्थेने चौकशी ; कुटूंबियांनी घेतली मुंबईत भेट

जालना -
अन्वा (ता. भोकरदन) येथील कैलास बोराडे या तरूणांवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गंभीर दखल घेतली असून यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना आज दूरध्वनीवरून संपर्क साधून आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, त्या तरूणाच्या कुटुंबियांनी ना. पंकजाताईची मुंबईत भेट घेतली.

महाशिवरात्रीच्या दिवशी अन्वा येथील रहिवासी असलेल्या कैलास बोराडे या तरुणास कार्ला जानेफळ येथील वटेश्वर मंदिरात भागवत दौंड व नवनाथ दौंड यांनी मारहाण करून भट्टीत गरम केलेल्या सळईने सर्व अंगावर डाग देऊन अतिशय अमानुषपणे अत्याचार केले. बोराडे याच्यावर सध्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत, दरम्यान पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पोलिस अधिक्षकांशी फोन करुन घटनेची सविस्तर माहिती घेतली. या घटनेतील एक आरोपी अटकेत आहे. दुर्सयाचा शोध तातडीने लावून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे आदेश त्यांनी पोलिस अधीक्षकांना दिले. दरम्यान कैलास बोराडे या तरूणांच्या भावाने आणि कुटुंबातील सदस्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कैलासच्या प्रकृतीची आस्थेने चौकशी केली आणि आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याबद्दल कुटुंबियांना आश्वस्त केले.



# वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना फासावर चढवा- आ.संदीप क्षीरसागर

धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा ही प्रकरण उघडकीस आल्यापासूनची आमची मागणी होती. ती आता पूर्ण झालेली आहे. कारण वैयक्तिक वाल्मिक कराड स्वतः एवढा मोठा नाही की, त्याच्यावर गुन्हा दाखल व्हायला इतका वेळ लागतो. त्याच्या सांगण्याप्रमाणे प्रशासनातील अधिकारी काम करतात. यामागे निश्चित धनंजय मुंडे यांची राजकीय शक्ती होती. त्यामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे क्रमप्राप्त ठरत होते. परवा तपास यंत्रणांकडून दाखल केलेल्या चार्जशीट मधील स्व.संतोष देशमुख यांना मारहाण केल्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले. अक्षरशः काळजाला पीळ पडावा असे ते सगळी दृश्य आहेत. माणूसकी मेल्याचे हे सर्व पाहून जाणवते. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या डोळ्यात ते फोटो आणि व्हिडिओ पाहिल्यानंतर पाणी आल्याशिवाय राहिले नाही. इतका बिभत्स तो प्रकार आहे. स्व.संतोष देशमुखांचे नराधम मारेकरी म्हणजे माणूसकीला लागलेले कलंक आहेत. त्यामुळे या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह सर्व मारेकर्यांना लवकरात फासावर चढवा. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. तसेच सध्या चर्चा होत असल्याप्रमाणे जर खंडणीसाठी मंत्री धनंजय मुंडे यांच्या शासकीय बंगल्यावर बैठक झाली असेल आणि स्वतः धनंजय मु ंडे त्या बैठकीला उपस्थित होते. ही बाब सत्य असल्याचे पडताळून त्यांनाही या प्रकरणात सहआरोपी करण्यात यावे असेही आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

# यश संपादन करण्यासाठी जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाची तयारी ठेवा :- डॉ.अजयदादा धोंडे

आष्टी प्रतिनिधी: विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रम घेण्याची तयारी ठेवावी. कोणतेही काम करताना मनापासून करावे यश निश्चित मिळते असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व युवा नेते अजयदादा धोंडे यांनी कडा येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयात झालेल्या पदवीप्रदान समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ अजयदादा धोंडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, उपप्राचार्य डॉ. बापु खैरे, उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण, उपप्राचार्य डॉ. वाघुले, प्रा. पंडित औटे, प्रा. म हेमुद पटेल, प्रा. बाळासाहेब धोंडे, प्रा. दत्तात्रय बोडखे, प्रा. गोपिनाथ बोडखे व इतरांची उपस्थिती होती.

प्रारंभी स्व. बाबाजी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, भविष्यात चांगले करिअर करण्यासाठी विचारपूर्वक क्षेत्र निवडावे,नौकरी व व्यवसायांमध्ये अपयश आले तरी निराश होऊ नका, एक ना एक दिवस यश निश्चित मिळते. पदवी घेतल्यानंतर खरी जबाबदारी विद्यार्थ्यांवर पडते. पदवीनंतर नौकरी, व्यवसाय करा आई-वडिलांचे व महाविद्यालयाचे नावलौकिक करा. विद्यापिठातील पहिल्या महाविद्यालयामध्ये आपल्या संस्थेचे भगवान महाविद्यालय व आनंदराव धोंडे हि दोन महाविद्यालये आहेत ही कौतुकास्पद बाब आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, हा महाविद्यालयाचा चौथा पदवीप्रदान समारंभ आहे. विद्यार्थ्यांनी कष्ट करुन मिळवलेली पदवी स्वीकारणे हा जिवनातील आनंदचा दिवस आहे. पदवी घेताना तीन वर्षांत मिळालेल्या ज्ञानाचा भविष्यात चांगल्या काम ासाठी उपयोग करावा. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी सांगितले की, आपले विद्यापिठ सुरू झाले त्यावेळी अंतर्गत फक्त नऊ महाविद्यालये होती

# कोणत्याही नेत्याने आपल्या कार्यकर्त्यांवर आंधळेपणाने विश्वास टाकू नये -अजित पवार

मु ंबई । प्रतिनिधी बीडचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्र ूरपणे केलेल्या हत्येनंतर त्याच्या हत्येवेळचे काही विदारक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झालेत. यानंतर राज्याचे माजी अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मु ंडे यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा काल दिला. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवार यांच्या उपस्थितीत मंगळवारी रात्री राष्ट्रवादीची एक बैठक पार पडली. धनंजय मु ंडे यांच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादीची ही पहिलीच बैठक होती. या बैठकीत अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह नेत्यांना एक महत्त्वपूर्ण सल्ला देत कानमंत्रच दिल्याचे पाहायला मिळाले.



कोणत्याही नेत्याने आपल्या कार्यकर्त्यांवर पूर्णपणे किंवा आंधळेपणाने विश्वास टाकू नये, असे अजित पवारांनी सांगितले. पूर्णपणे कार्यकर्त्यांच्या जीवावर राजकारण करू नका. कार्यकर्ते जर व्यवस्थित नसतील तर त्याची झळ पक्षाला लागते, असं अजित पवार यांनी आपल्या नेत्यांना कानमंत्र दिला. विशेष म्हणजे धनंजय मु ंडे यांच्या राजीनाम्यानंतर झालेल्या पहिल्या बैठकीत अजित पवार यांनी त्यांच्या समोरच हे वक्तव्य केलं. अजित पवार यांनी या बैठकीत राष्ट्रवादीच्या नेत्यांना धनंजय मुंडेंचे उदाहरण देत परावलंबी न होता स्वावलंबी व्हा, असा सल्ला दिल्यानंतर नेत्यासोबत कार्यकर्ते व्यवस्थित नसतील तर त्याची झळ नेत्यासोबत पक्षाला देखील कशाप्रकारे बसते हे धनंजय मु ंडे प्रकरणातून आपल्याला दिसून आले आहे, असे अजित पवार यांनी म्हटले.

# कोणामुळे या गोष्टी घडल्या? कोण पाठराखण करत होतं? संतोष देशमुख हत्येच्या चौकशीचा पार्ट टू लवकरच सुरु होणार

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी कसून चौकशी सुरु आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणी चार्जशीट दाखल केल्यानंतर आज त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी एसआयटी अधिका-यांची भेट घेतली. या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी आता तपासाचा पार्ट टू सुरू झाला आहे. पार्ट टू मध्ये सगळ्यांचा पर्दाफाश होईल, असे ते म्हणाले. न्यायालय समितीचे काम लवकरात लवकर चालू करावं, अशी विनंती धनंजय देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. येत्या २७ तारखेला चार्जशीट दाखल करण्यात आली आहे. आज आम्ही अनिल गुजर यांना भेटलो तपासाबाबत चर्चा झाली. स्पेशल केस म्हणून या तपासाकडे सगळ्यांनी पाहिल आहे. आता हे एक टप्पा झाला आहे. आता या तपासाचा पार्ट टू इथून पुढे चालू होईल. राहिलेल्या आरोपीला पकडायचं हे पोलीस यंत्रणेपुढे आवाहन असणार आहे. पार्ट टू मध्ये राहिलेले जे कोणी आहेत, ज्याच्या कुणामुळे या सगळ्या गोष्टी



घडल्या, कोण यांचा सगळ्याची पाठराखण करत होता, याची चौकशी होईल. जिल्ह्यातील खून प्रकरण, एवढे गुन्हे कशाच्या जीवावर केले आणि त्या गोष्टीला धरून गुन्हेगारी वाढवली. बीड जिल्ह्यात चुकीच्या गोष्टी करून राज्यात चुकीची ओळख निर्माण केली, त्याचा सगळा पर्दाफाश पार्ट टू मध्ये होईल, असे धनंजय देशमुख म्हणाले.त्याच्यामध्ये काही पण होऊ शकतं. महत्त्वाचा पार्ट इथून पुढे आहे. उघड उघड यामध्ये आरोपी होते, व्हिडीओ आहेत, फोटो आहेत, सीसीटीव्ही आहेत आणि एक आरोपांची कडी जोडली आहे. पडद्यामागून कारनामे करण्याचे षडयंत्र, यांना जे कोणी अभय देत असेल. त्यामध्ये डिपार्टमेंटचे सुद्धा लोक असू शकतात. इतरही लोक असू शकतात, तो तपास लवकर चालू होणार आहे. चार्जशीटचे जे बुलेट पॉईट काढले आहेत. ५३ पानाचे ते मिळाले आहेत. मुख्य चार्जशीट मिळायची बाकी आहे, असेही धनंजय देशमुख यांनी सांगितले.

त्यांच्या विरोधात संतापाची लाट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना आम्ही विनंती करणार आहोत की न्यायालय चौकशी समिती स्थापन केली आहे. त्यांनी लवकरात लवकर त्या मार्फत या जिल्ह्याची परिस्थिती अशी का झाली, त्याला कोणता व्यक्ती जबाबदार आहे, कोणती संस्था जबाबदार आहे याचा तपास लवकरात लवकर सुरू व्हावा असे धनंजय देशमुखांनी म्हटले.

ङ्गमाझा न्यायाचा लढा आहे. कुठली गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना माझ्या भावाला संपवलं. स्वतःचा भाऊ, स्वतःचा मुलगा समजून या गोष्टी कधी कधी लक्ष दिलं नाही, पाठराखण केली जाते चुकीच्या माणसाचा समर्थन केलं जातं. असं बोटावर मोजण्या इतपत लोक आहेत. सगळे लोक न्यायाच्या भूमिकेत आहेत. जे अन्यायाच्या भूमिकेत चुकीला चूक म्हणणारे जे कोणी लोक नाहीत. त्यांच्या विरोधात संतापाची लाट आहे. आक्रोश आहे. त्या संदर्भात मी काही बनाही असे धनंजय देशमुख म्हणाले.ङ्गमला त्याच्यावर काही बोलायचं नाही

ङ्गयेत्या १२ मार्चच्या आधी उज्ज्वल निकम साहेबांची भेट घेण्याचा आमचा मानस आहे. आम्ही त्यांना भेटू चार्जशीटबद्दल त्यांच्याकडून काही गोष्टी आहेत. ज्या दिवशी नामदेव शास्त्री यांनी प्रतिक्रिया दिली, म्हणून दुस-या दिवशी लगेच मी भेट घेतली. आदल्या रात्री सगळं असत्य सांगितलं गेलं होतं. म्हणूनच पुढच्या दिवशी जे सत्य आहे ते मी सांगायला गेलो होतो. त्यांची जी चूक झाली होती ते म्हटले की अजानतेपणाने मी या गोष्टी बोललो होतो. जे आम्ही पुरावे दिले, ज्या गोष्टी वास्तव आहेत. त्या गोष्टीमुळे आज त्यांनी प्रतिक्रिया दिली. त्याच्यावर ज्या काही गोष्टी सांगितल्या होत्या त्या एकदम चुकीच्या होत्या. हे आज सिद्ध झालं आम्ही सांगितलेल्या गोष्टी ख-या होत्या हे पण सिद्ध झालंङ्घ, असे धनंजय देशमुख म्हणाले. पंकजा मुंडे यांची प्रतिक्रिया आहे, त्यांनी कधी यायला पाहिजे होतं. कधी जायला पाहिजे होतं. हे सगळे मुख्यमंत्र्यांचे अधिकार होते. उपमुख्यमंत्र्यांचे अधिकार होते. त्यांनी प्रतिक्रिया आज दिली, त्यांनी अगोदर कधी दिली असती तर त्यांचा विचार केला असता, राजीनामा झाल्यानंतरची प्रतिक्रिया आहे. त्यामुळे मला त्याच्यावर काही बोलायचं नाही, असे धनंजय देशमुखांनी म्हटले.

## संपादकीय

# राज्यपालांच्या अभिभाषणात गुंतवणुकीला प्राधान्य

राज्य विधान मंडळाच्या अधिवेशनाला आजपासून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारची धोरणे आणि योजना यांचा दस्तऐवज असतो. त्यामुळे या अभिभाषणाला महत्त्व असते. सरकार काय करणार आहे आणि राज्याची आर्थिक वाटचाल कशी होणार आहे याचे त्यात दिशादर्शन केलेले असते. त्यामुळे राज्यपालांच्या अभिभाषणाकडे साऱ्यांचे लक्ष असते. राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात महनीय व्यक्ती जिजामाता आणि इतर अनेकांचा नामोल्लेख केला हे उचितच झाले. राज्यपालांनी दाव्होस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये झालेल्या करारानुसार महाराष्ट्राने राज्यात आणलेल्या प्रचंड गुंतवणुकीचाही उल्लेख केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालानंतर पहिलेच अधिवेशन होत असल्याने त्याला आगळे वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते. ते राज्यपालांच्या भाषणात दिसून आलेच. राज्यपालांचे भाषण असले तरीही त्यात सरकारी धोरणांचा महत्त्वाचा उल्लेख होत असल्याने राज्य सरकार काय करणार आहे, याचेच त्यात दिशादर्शन दिसत होते. त्यानुसार सरकारने अत्यंत महत्त्वाची घोषणा करत, महाराष्ट्र इलेक्ट्रिक धोरणाची अंमलबजावणी येत्या १ एप्रिलपासून केली जाईल असे सांगितले. राज्यात पेट्रोल आणि डिझेल इंधनांची टंचाई निर्माण होत असल्याने इलेक्ट्रिक वाहनांकडे राज्याने वळावे हा सरकारचा हेतू आहे आणि त्यानुसार इलेक्ट्रिक वाहनांना अनुदान आणि जुनी वाहने निकाली काढणे यांचा समावेश यामध्ये करण्यात आले आहे. कारण राज्यात पेट्रोल आणि डिझेल टंचाई ही चिंताजनक बाब आहे. डावोस येथे झालेल्या करारांनुसार १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार महाराष्ट्र सरकारने ६३ आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी केले होते. त्याचा लाभ १५ लाखांहून अधिक रोजगार निर्मितीला होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार महाराष्ट्र- कर्नाटक सीमा वाद सोडवण्यास बांधील आहे, ही राज्यपालांची घोषणा आश्वासक आहे आणि त्यातून महाराष्ट्र सरकार राज्याचा किती सातत्याने विचार करते हे दिसून आले आहे. सीमा वादावर शिवसेनेने प्रचंड राजकारण केले आहे आणि त्याला फडणवीस सरकारने यातून जोरदार उत्तर दिले आहे असे म्हणता येईल. या अधिवेशनात महाराष्ट्र-कर्नाटक सीमा विवाद आणि गुंतवणूक आणि राज्यातील बेरोजगारी हे प्रमुख मुद्दे असतील आणि राज्यपालांच्या अभिभाषणात त्यांचेच प्रामुख्य दिसून आले. आपल्या अभिभाषणात राज्यपालांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडवण्याचा निर्धार व्यक्त केला. हा प्रश्न राज्याला गेल्या अनेक दशकांपासून सतावत आहे आणि त्यावर कितीही राज्य सरकारे आली तरीही उपाय सापडलेला नाही. कर्नाटकात आता तर काँग्रेसचे सरकार आहे आणि त्यामुळे हा प्रश्न सोडवणे आणखीच अवघड झाले आहे. राज्यपालांनी म्हटले की, महाराष्ट्र सरकारने तज्ज्ञ वकिलांची नेमणूक न्यायालयात हा प्रश्न सोडवण्यासाठी केली आहे. राज्याचा फोकस मराठी भाषा बोलणाऱ्या व्यक्तींचे प्रश्न सोडवण्याकडे आहे हे राज्यपालांनी अभिभाषणात ठासून सांगितले. राज्याची आर्थिक स्थिती स्पष्ट करताना राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्र प्रगत औद्योगिक राज्य म्हणून देशाच्या एकूण जीडीपीपैकी १४ टक्के योगदान देते. ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. काँग्रेसचे सरकार होते तेव्हा राज्याकडून जीडीपीतील सर्वाधिक वाटा जात असूनही राज्याला फार कमी वाटा मिळत असे. पण आता डबल इंजिन सरकार असल्याने महाराष्ट्राला याचा लाभ होत आहे आणि याचे प्रत्यंतर अभिभाषणात आले. थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे हे राज्यपालांनी नमूद केले. ही राज्यासाठी निश्चित गौरवास्पद बाब आहे. डावोस येथे पार पडलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीत महाराष्ट्राने १५.७२ लाख कोटी रुपयांचे करार केले आणि त्याचा उल्लेख राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केला. यापूर्वी उद्धव ठाकरे सरकार असताना त्यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे दावोस येथे गेले होते. पण ते एका पैशाचीही गुतवणूक आणू शकले नव्हते. त्याच्या उलट ही स्थिती आहे आणि ही निश्चितच कौतुकाची गोष्ट आहे. ज्या कंपन्यांशी महाराष्ट्राने करार केले आहेत, त्यामुळे १५ लाखांहून अधिक रोजगारांची निर्मिती होणार आहे आणि ही काही साधी बाब नाही. राज्यपालांनी म्हटले की, आमचे सरकार राज्याची औद्योगिक वाढ आणि रोजगारांच्या संधी निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे आणि यामुळेच महाराष्ट्रात जनतेने पुन्हा एकदा भाजपाला निवडून दिले आहे. त्याचे भान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठेवले आहे. त्याचसोबत एक महत्त्वपूर्ण घोषणा राज्यपालांनी केली आहे, ती म्हणजे ३५०० एकर औद्योगिक प्लॉट्स राज्यात उद्योगधंद्यांचा विकास करण्यासाठी दिले जाणार आहेत. राज्यातील दहा हजार एकर जमीन उद्योगिकीकरणासाठी देण्याची घोषणाही राज्य सरकारने केली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी काही घोषणा आहेत आणि त्यापैकी एक आहे ती म्हणजे मुलींना मोफत शिक्षण देण्याची आणि बचत गटांचे सक्षमीकरण करणार आहे. या घोषणा स्वागतार्ह आहेत. आरोग्य, शिक्षण आणि उपजीविका क्षेत्रावर विशेष लक्ष दिले जाणार असून मानवी विकास कार्यक्रमांतर्गत मागासलेल्या ब्लॉक्सना विशेष सहाय्य दिले जाईल. त्याचबरोबर परवडणाऱ्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर सरकार लक्ष ठेवणार आहे. राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य विमा योजना मिळवून देण्यासाठीही सरकार काम करणार आहे. त्याशिवाय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बेरोजगार तरुण-तरुणींना राज्य सरकार वाढती संधी देत आहे. एकूण राज्यपालांचे अभिभाषण हे राज्य सरकारचे पुढील मुदतीत काय करणार

# संतोष देशमुख हत्या : मानवतेवर झालेला आघात, कठोर कारवाई गरजेची.डॉ. सुवर्णा कराड

काल पाहिलेल्या देशमुख यांच्या मृतदेहाच्या छायाचित्रांनी संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. माणसाच्या शरीरावर झालेली अशी क्रूरता पाहून मन खिन्न होतं. मृतदेहाच्या भोवती हिंस्र पशूसारखी वागत असलेली माणस जेव्हा पाहिली, तेव्हा वाटलं की आपण खरंच एका सभ्य समाजात राहतो का? मी एक महाविद्यालयाचा प्राध्यापक म्हणून शिकवतांना जात, पात ,धर्म लिंग भेद न करता समानतेचे शिक्षण देतो . मानुस हा समाजशील प्राणी आहे तो समाजाशिवाय राहू शकत नाही. कुटुंब संस्था,विवाह संस्था, शैक्षणिक संस्था, राजकीय संस्था,विवीध मंडळामार्फत सामाजिक नियंत्रण या विविध संस्थाच्या माध्यमातून मानवी जीवनाचे सामाजिकीकरणातून व्यक्तीमत्व घडत असते . पण हे दृश्य पाहून मनात जी भावना निर्माण झाली, ती शब्दांत मांडणं गरजेचं आहे. सत्य काय आहे, कोणतीही घटना घडते तेव्हा तिच्या दोन्ही बाजू काय आहेत, हे मला निश्चित माहित नाही. परंतु, जे दिसत आहे, ते अत्यंत वेदनादायक आणि अस्वस्थ करणारे आहे. अशा अमानुष घटनांवर संताप होणं स्वाभाविक आहे.

आपला समाज हा न्याय आणि माणुसकीवर आधारलेला आहे. कुणीही दोषी असेल, तरी त्याला कायद्याच्या चौकटीत शिक्षा झाली पाहिजे. परंतु, जर कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन अशा प्रकारे हत्याकांड घडत असेल आणि मृतदेहाची विटंबना होत असेल, तर आपण कोणत्या दिशेने जात आहोत, याचा विचार करायला हवा.माणसाच्या मृतदेहाची अशी विटंबना करणं ही फक्त एका व्यक्तीची हत्या नसते, तर ती संपूर्ण मानवतेच्या मुल्यांची हत्या असते. कोणीही कितीही चुक किंवा गुन्हा केली असला तरी अशा प्रकारे त्याचा मृतदेह विटाळणं, त्यावर अत्याचार करणं ही केवळ विकृती नाही, तर एका अस्वस्थ समाजाचं लक्षण आहे.महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आहे, न्यायप्रियतेचा वारसा आहे. या भूमीत अन्यायाविरुद्ध आवाज उठवला जातो. मग आज आपण असं नृशंस कृत्य उघड्या डोळ्यांनी पाहूनही शांत कसे राहू शकतो? अशा घटनांमध्ये तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. लोकशाही आणि न्यायव्यवस्थेवर विश्वासआपला देश हा लोकशाहीप्रधान आहे. कायद्याचं राज्य असतं, आणि प्रत्येकाला न्याय मिळावा, हीच अपेक्षा आहे. म्हणूनच, कुठलीही घटना घडली की तिच्या सत्यपरिस्थितीची नीट चौकशी झाली पाहिजे. कुणालाही आधीच गुन्हेगार ठरवणं योग्य नाही, आणि न्यायालयाने दिलेला निर्णयच अंतिम मानला पाहिजे. परंतु, हे प्रकरण जितकं गंभीर आहे, तितक्याच गतीने त्यावर न्याय मिळणं महत्त्वाचं आहे.कायदा हातात घेणाऱ्यांना रोखणं गरजेचं आहे. अन्यथा, उद्या कुठलाही निर्दोष माणूस या क्रूरतेचा बळी ठरू शकतो. त्यामुळेच, शासन आणि न्यायव्यवस्थेने अशा घटनांकडे गांभीर्याने पाहायला हवं.दहशत आणि कायद्याची भीती:जेव्हा समाजात गुन्हेगारांना कायद्याची भीती राहत नाही, तेव्हा अशा घटना घडतात. जर कायदा कठोर असेल आणि वेळेवर न्याय मिळत असेल, तर अशा क्रूर घटनांना आळा बसू शकतो. पण जर गुन्हेगारांना हे माहित असेल की काही दिवसांनी लोक विसरतील, तपास कमी होईल, आणि वेळ मारून न्याय मिळेल, तर त्यांचं मनोबल वाढतं.म्हणूनच अशा घटनांवर वेगाने आणि कठोर न्याय होणं आवश्यक आहे. न्यायालयानेही हे लक्षात घ्यावं की केवळ गुन्हेगारांना शिक्षा देणं पुरेसं नाही, तर समाजात एक खणखणीत संदेश द्यायला हवाकोणीही कायद्याच्या पलीकडे नाही.

सामाजिक सलोखा आणि जबाबदारीहा केवळ एका कुटुंबाचा किंवा एका व्यक्तीचा प्रश्न नाही, हा संपूर्ण समाजाच्या सुरक्षिततेचा आणि नैतिकतेचा प्रश्न आहे. जात, धर्म, भाषा या सगळ्या गोष्टींच्या पलीकडे जाऊन आपण एकत्र येणं गरजेचं आहे. कारण हिंसा कुणालाही सोडत नाही.परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव ठेवून, प्रत्येकाने जबाबदारीने वागायला हवं. सोशल मीडियावर काहीही खोटी माहिती पसरवून समाजात गैरसमज वाढवण्याचा प्रयत्न होतो, असं अनेक वेळा आढळून आलं आहे. त्यामुळे सत्य काय आहे, हे समजून घेण्याची गरज आहे. पण त्याच वेळी, या घटनेत जे निर्दोष आहेत, त्यांना न्याय मिळायलाच हवा.प्रशासन आणि जबाबदारी: सरकारने आणि पोलीस प्रशासनाने यावर तातडीने कारवाई केली पाहिजे. देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळणं आवश्यक आहे. हे प्रकरण न्यायालयात आलं की अनेक तारखा पडतात, वर्षानुवर्षे खटले चालतात, आणि शेवटी निकाल लागत नाही. पण हे प्रकरण वेगळं आहे. यात फक्त एक व्यक्ती मारली गेलेली नाही, तर माणुसकीच मृत्युमुखी पडली आहे.सरकारने कायद्यामध्ये अशी तरतूद करायला हवी की ज्या घटना समाजाच्या मानसिकतेवर खोल परिणाम करतात, त्या प्रकरणांचा वेगाने निकाल लागला पाहिजे. जर न्याय लवकर मिळाला, तरच अशा घटनांना प्रतिबंध होईल.संताप आणि संवेदनशीलता यांचा समतोल:माझा कुणालाही आधीच दोषी ठरवण्याचा किंवा कोणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नाही. परंतु, माणुसकीच्या नात्याने, एका शिक्षकाच्या भूमिकेतून, समाजात शांतता, सुव्यवस्था आणि न्याय नांदावा, हीच माझी प्रामाणिक इच्छा आहे. म्हणूनच, शासनाने आणि न्यायसंस्थेने वेगाने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी. अशा घटनांवर त्वरित आणि कडक न्याय झाला तरच समाजात भीती निर्माण होईल आणि भविष्यात अशा घटना घडण्यास आळा बसेल.

# सांगली जिल्हा सहकार भारती मार्फत पापड महोत्सव

## महिला उद्योजकांना उद्योग वाढविण्याची संधी..

शिराळा / प्रतिनिधी

वाळवण करणाऱ्या महिला उद्योजिकांसाठी आपला उद्योगाचीवाढ व्हावी,बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी सहकार भारती सांगली महानगर,जिल्हा सहकार भारती (ग्रामीण) आणि रणरागिणी प्रभाग,कवलापूर यांच्या मार्फत दिनांक २२ व २३ मार्च या काळात पापड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन व महिला प्रमुख सारिका मुळे यांनी दिली.

सांगली जिल्हा सहकार भारती( ग्रामिण) च्या कार्यकारणीची बैठक श्री दत्त नागरी पत संस्थेच्या स्वर्गीय जी.एस.कुलकर्णी सभागृहात पार पाडली.संस्थेचे कार्यलक्षी संचालक महेश कबाडे यांनी सर्वांचे स्वागत केले.विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप यांनी भविष्यात होणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेखा सांगुन सर्वांना मार्गदर्शन केले.यावेळी महिला प्रमुख सारिका मुळे यांनी पापड महोत्सवाची माहिती दिली त्या म्हणाल्या की लघुउद्योग करणाऱ्या महिलांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतुने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.२२ व २३ मार्च रोजी कच्छी जैन भवन,राम मंदिर चौक सांगली हा महोत्सव होणार असुन प्रायोजक आदि अरिहंत को-ऑप क्रेडीट सोसायटी हे आहेत असे सांगुन त्या म्हणाल्या की




यामध्ये नवीन उद्योग सुरू करणाऱ्या महिलांना माहिती दिली जाणार आहे. नोंदणी करणाऱ्या प्रत्येक गटाला प्रमाणपत्र दिले जाणार आहे.उत्कृष्ठ गटाचा यथोचित करण्यात येणार आहे असे सांगून भाग घेणाऱ्या गटांनी सारिका मुळे ९५६१४९८२८४,संपदा आरवाडे ८३२९९६२६८६ व उत्कर्षा लाडे ९८८१०३३७७० या भ्रमणध्वनी वर संपर्क साधावा असे आवाहन केले.प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे यांनी या महोत्सवात प्रत्येक तालुक्यातून सहभाग अपेक्षित आहे असे सांगुन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सहकारी संस्था आहेत त्यामुळे सहकार भारती प्रत्येक तालुक्याच्या गावापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगुन कामाबाबत सविस्तर माहिती दिली.जिल्हा अध्यक्ष सुमंत महाजन म्हणाले सहकार भारतीचे काम वाढवण्यासाठी प्रत्येक तालुक्यात सक्षम तालुका कार्यकारिणी करणे गरजेचे आहे त्यामुळे १० एप्रिल पर्यंत सर्व तालुक्याच्या कार्यकारिणी व्हाव्यात यासाठी सर्वांनी प्रयत्न करूया असे सांगितले.पुढील जिल्हा कार्यकारिणीची बैठक १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणार असे सांगितले.या बैठकीला सौ.अश्वीनी आठवले, महामंत्री भारत निकम,संग्राम कुलकर्णी, चंद्रकांत खंकाळे,अजितराव खराडे,आनंदराव निकम,विठ्ठल निकम,बाळासाहेब पाटील,सौ.स्नेहलता कुलकर्णी इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य. पदाधिकारी निवड होणार - शांताराम खुडे

पाटोदा (प्रतिनिधी)
भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य.
समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष, मा.डॉ. चंद्रकांत उदूगडे पाटील. यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पुणे येथे झालेल्या आढावा बैठकीत नवीन कार्यकारणी जाहीर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सामाजिक काम करणाऱ्या इच्छुक कार्यकर्त्यांनी संपर्क साधावा. या बैठकीत नवीन कार्यकारणी जाहीर करण्याबाबत. चर्चा करण्यात आली . यामध्ये बरीच वर्ष झाली कार्यकारणी जाहीर केल्यापासून कार्यकारणीतील पदाधिकारी ज्या पदावर काम करत आहेत. त्या पदाचा फेरविचार करून प्रत्येकाला नवीन संधी देण्याबाबत आडवा बैठकी घेण्यात आली.यामध्ये महाराष्ट्राच्या कार्यकारणी मध्ये त्याचप्रमाणे पुढील. तालुका अध्यक्ष, शहराध्यक्ष. जिल्हाध्यक्ष.



नवीन निवड करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून. सदर निवड प्रतिक्रिया दिनांक, मार्च १/०३/२०२५ पासून ही पत्रिका सुरू झालेली आहे. तरी सदर भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे, पदाधिकारी सदस्य यांनी या विषयावरती आपली प्रतिक्रिया आपल्या निवेदनाद्वारे कळवावी ही आपणास सर्वांना विनंती. राष्ट्रीय उपाध्यक्ष शांताराम खुडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे

जे पदाधिकारी आता ज्या पदावर काम करत आहेत. त्यांनी आपल्या पदाच्या कार्यकाळामध्ये केलेल्या कामाचा थोडक्यात आढावा हा देखील समिती ऑफिसला पाठवावा. असे समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले

जे नवीन सदस्य समितीमध्ये काम करण्यासाठी इच्छुक आहेत त्यांनी आपला बायोडेटा समितीकडे पाठवावा असे समितीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शांताराम खुडे
भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य.
मध्यवर्ती कार्यालय,
ऑफिस सेक्टर नंबर ४/३२, सेक्टर नंबर, १० प्राधिकरण भोसरी पुणे.४११०२६.येथे कळवावे संपर्क फोन नंबर, पुढील प्रमाणे ८३२९२१०५६४
आपला विश्वासु
श्री.शांताराम गणेश खुडे.
उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य

# आधीच्या वक्तव्यापासून नामदेव शास्त्रींचा यूटर्न अजाणतेपणातून वक्तव्य केल्याची कबुली

बीड : मागील तीन महिन्यांपासून महाराष्ट्रात संतोष देशमुख हत्या प्रकरण गाजत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येपासून बीड जिल्ह्यात जातीय सलोखा देखील बिघडला आहे. मराठा आणि ओबीसी समाजात तणाव बघायला मिळत आहे.संतोष देशमुख हत्येप्रकरणी राज्यभर आरोपींवर कडक शासन करण्याची मागणी केली जात असताना भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी वेगळी भूमिका घेतली होती. त्यांनी धनंजय मुंडेंना पाठिंबा जाहीर करत आरोपींनी कोणत्या मानसिकतेतून ही हत्या केली, हेही मीडियाने समजून घ्यावं, अशा आशयाचं वक्तव्य केलं होतं. या वक्तव्याचे पडसाद राज्यभर उमटले होते. चहू बाजुने नामदेश शास्त्रींवर टीका केली जात होती. नामदेव शास्त्रींच्या वक्तव्यानंतर जातीय तणाव देखील वाढला होता. या सगळ्या





घडामोडींनंतर नामदेव शास्त्रींनी आपली भूमिका बदलली आहे. त्यांनी आपल्या आधीच्या वक्तव्यापासून यूटर्न घेतला असून संबंधित वक्तव्य अजाणतेपणातून केल्याची कबुली त्यांनी दिली आहे. संतोष देशमुख यांच्या खुनाचे फोटो व्हायरल झाल्यानंतर नामदेव शास्त्रींनी आपली भूमिका बदलली आहे.या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना नामदेव शास्त्री महाराज म्हणाले, मला आधी या घटनेची तीव्रता माहीत नव्हती. पहिल्या दिवशीच मी जे वक्तव्य केलं, ते अजाणतेपणातून केलं. पण जेव्हा संतोष देशमुख यांचं कुटुंब माझ्याकडे आलं, तेव्हा त्यांनी हे किती भयंकर क्रौर्य आहे, याची मला जाण करून दिली. मला त्याची जाणीव झाली. माझं अंतकरण दुखावलं, मन हेलावलं. मी न्यायालयाला विनंती करतो, हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना कठोर शिक्षा मिळावी. भगवानगड सदैव देशमुख कुटुंबाच्या पाठीशी आहे. असं महंत नामदेव शास्त्री यांनी म्हटलं.

# गुन्ह्याचे व्हिडिओ गृह मंत्रालयाकडे होते, तरी तुम्ही गप्प का बसलात?

## धनंजय देशमुख यांचा राज्य सरकारला सवाल



केज : नेत्यांना गुन्ह्याचा घटनाक्रम माहीत होता. माझ्या भावाला मारल्याचे व्हिडिओ आधीच गृह मंत्रालयाकडे गेले होते. तरी एवढे दिवस गप्प का बसलात, असा सवाल सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला. राज्याचे अनेक नेते खालच्या स्तराची विचारसरणी घेऊन चालले आहेत. त्यांना नियती माफ करणार नाही. माझ्या भावाने शेवटच्या क्षणी माझी वाट पाहिली असेल. एका निष्पाप व्यक्तीचा बळी गेला, त्याचं तुम्हाला दुःख कधीच झालं नाही. नियती यांचा काळाबाजार उठवणार. भावाला क्रूर पद्धतीने मारणाऱ्यांना गोळ्या घाला, असे ते म्हणाले. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील विदारक फोटो सोमवारी व्हायरल झाल्याने गावकऱ्यांच्या भावनांचा उद्रेक झाला. हत्या प्रकरणातील सर्वच आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून मंगळवारी गावकऱ्यांनी कडकडीत बंद पाळला. मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी मंगळवारी बीड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले होते. माजलगाव, परळी हे तालुके वगळता केज, धारूर, अंबाजोगाई, वडवणी, धारूर, गेवराई, बीड शहरात मराठा समाजबांधवांनी एकत्रित कडकडीत बंद पाळला. व्यापारी पेठा बंद असल्याने रस्त्यांवर शुकशुकाट होता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ६ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# ठाणेदार निळे यांना समाज रत्न पुरस्कार



महागाव प्रतिनिधी
विविध ठिकाणी आपल्या कार्यातून कामाचा ठसा उमटवून समाजामध्ये नावलौकिक निर्माण करणारे दबंग शांत संयमी सध्या महागाव महागाव पोलीस स्टेशन मध्ये येथे रुजू असलेले ठाणेदार धनराज दौलतराव निळे यांना २०२५ चा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार यशवत संघर्ष सेना महाराष्ट्र राज्य च्या वतीने जाहीर करण्यात आले असल्याचे यशवंत संघर्ष सेना चे संस्थापक अध्यक्ष विष्णू कुन्हाडे यांनी सांगितले असून धनराज निळे यांनी त्यांच्या आतापर्यंतच्या कार्यकाळातील कार्याची दखल पाहता हा समाज रत्न पुरस्कार जाहीर झाला असून मोठ्या थाटामाटात हा पुरस्कार त्यांना प्रदान करणार असल्याचे यशवंत सेनेचे अध्यक्ष विष्णू कुन्हाडे यांनी जाहीर केल्याने ठाणेदार धनराज निळे यांच्यावर सर्वत्र कडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# भेंडा येथील जिजामाता विद्यालयात दहावी व बारावी च्या परीक्षा कॉपी मुक्त वातावरणात संपन्न

संतोष औताडे- अहिल्यानगर प्रतिनिधी -- सविस्तर माहिती- नेवासा तालुक्यातील भेंडा बु येथील जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे नुकत्याच झालेल्या दहावी व बारावी च्या बोर्डाच्या परीक्षा कॉपी मुक्त वातावरणात संपन्न झाल्या असल्याचे जिजामाता विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी भारत वाबळे सर यांनी सांगितले. चालू शैक्षणिक वर्षापासून कॉपी मुक्त परिक्षा घेण्यासाठी महविद्यालया ने आवश्यक त्या सर्व उपाय योजना केल्या होत्या. दहावी बारावी परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष लक्ष दिले गेले.सर्व परीक्षार्थींनी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहचण्याच्या सूचना शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत देण्यात आल्या



आहेत. सकाळ सत्रात स. १०:३० आणि दुपार सत्रात दु. २:३० वाजता परीक्षार्थीनी परीक्षा दालनात उपस्थित राहणं आवश्यक आहे. यावेळी कोणताही गैरप्रकार होऊ नये म्हणून वेब कास्टिंग ,मॉनिटरिंग, ड्रोन कॅमेरे, व्हिडिओ शूटिंग,पोलिस गस्ती पथक व बैठे शिक्षकांचे पथक आदी यंत्रणा कार्यान्वित असल्याचे सांगण्यात आले.इयत्ता बारावी व दहावीची परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणात सुरळीतपणे पार पाडावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली बारावी व दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात, यासाठी महाराष्ट्र शासन व मंडळ, महाविद्यालय प्रयत्नशील आहे. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा लदाखल करण्यात येईल. तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात आले आहे. दरम्यान, महविद्यालयात कुठेही गैरप्रकार झालेला नाही.चालू शैक्षणिक वर्षापासून कॉपी मुक्त परिक्षा घेण्यासाठी महविद्यालयात आवश्यक त्या सर्व उपाय योजना केल्या होत्या. दरम्यान. यापुढच्या काळात सर्व परिक्षांच्यावेळी सुद्धा महविद्यालयात कॉपीमुक्त अभियान राबविले जाणार आहे, अशी माहिती प्रशासकीय अधिकारी भारत वाबळे सर यांनी सांगितले.

# सरकारी कामात अडथळा व बस चालकास मारहाण केल्या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड.गणेश हनुमंत तावरे

बीड (प्रतिनिधी):- मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड मा.आनंद ल.यावलकर साहेब यांनी दिनांक ५/३/२०२५ रोजी सत्र केस क्र.५६/२०२१ मध्ये शासकीय कर्मचाऱ्यास मारहाण करून सरकारी काम काजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता केलेली आहे आरोपी तर्फे ॲड .गणेश हनुमंत तावरे यांनी काम पाहिले सदरच्या केसची घटनेची हकीकत अशी की सौताडा येथे रेस्ट हाऊस समोर दिनांक ११/८/२०१२ रोजी आरोपी व इतर नी संगनमत करून फिर्यादीच्या ताब्यातील एस.टी. बस ला मोटरसायकल आडवी लावून बस थांबवून फिर्यादी चालक व वाहक यांना तुम्ही



एस.टी.बस का थांबवली नाही या कारणावरून फिर्यादीस खाली ओढले व शिवीगाळ करून लाथा बुक्याने मारहाण केली साक्षीदार वाहक हा सोडण्यास आला असता त्यास पण मारहाण करून त्याचा शर्ट फाडला त्यामुळे त्याचे खिशातील पैसे पडून तसेच तिकीट मशीन पडून मशीनचे नुकसान केले म्हणून सरकारी कामात स्थळा निर्माण करून जीव मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी आरोपी विरुद्ध पाटोदा पोलिस स्टेशन बीड येथे गु.र.नं.१२४/२०१२ कलम ३५३,३२३,५०४,५०६,४२७,३४ भा.द.वि नुसार फिर्याद दिली होती फिर्यादी कर्तव्यावर असताना आरोपी नागेश मोरे व इतर याने बसचालक यांना मारहाण करून जिवे मारण्याच्या धमक्या देवून शासकीय कामात अडथळा केल्याबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्याअनुषंगाने तपासी अमलदार यांनी सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मा. न्यायालया मध्ये फिर्यादी ,साक्षीदारांचे जबाब नोंदवून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, आरोपीच्या विरोधात सत्र केस क्रमांक ५६/२०२१ नुसार शासन वि नागेश प्रकरण चालवण्यात आले. सरकारी पक्षाच्या वतीने साक्षीदार यांचे जबाब नोंदवण्यात आले, आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला बचाव ग्राह्यधरून व साक्षीदारांच्या जबाबा मध्ये आलेली विसंगती पाहून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड.गणेश हनुमंत तावरे यांनी भक्कम बाजू मांडली.

# गेवराईत चांडक परिवाराकडून निवासी विद्यालयात मिष्टान्न भोजन



गेवराई । प्रतिनिधी शहरातील चांडक परिवाराच्या वतीने मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई येथे सामाजिक बांधिलकी जोपासून दिव्यांग विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. यावेळी चांडक परिवारासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

गेवराई शहरातील मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई या ५० विद्यार्थ्यांच्या निवासी शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांना येथील चांडक परिवाराच्या वतीने मिष्टान्न भोजन देण्यात आले. यावेळी गौरव विजयकुमार चांडक, शकुंतला विजयकुमार चांडक, पुजा संजयकुमार चांडक, प्रिया चिराग चांडक, किरण प्रभाकर शेंद्रे, उमेश यलिगार यांच्यासह शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने त्यांचे प्रशस्तीपत्र देवून आभार व्यक्त करण्यात आले.

# बालकीर्तनकार सोहम सातपुते यांचा आज होणार गौरव

बीड । प्रतिनिधी अखिल प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव सोहळा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुधवार ५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बालकीर्तनकार सोहम सातपुते यांचा गौरव होणार आहे. बालकीर्तनकार सोहम सातपुते यांनी आपल्या वाणीतून समाज प्रबोधन करण्याचे काम बाल वयात सुरू केले असून त्यांची दूरवर



ख्याती पसरलेली आहे. बाल वयात त्यांच्या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. समाज प्रबोधनाचे काम करणारे सोहम सातपुते यांचा आज बुधवार ५ मार्च रोजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष देविदास बसोदे यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार आहे.



जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, मेट्रन रमा गिरी यांच्या मार्गदर्शनात आनंद नगरी घेण्यात आली. यावेळी जिल्हा रुग्णालयातील वेगवेगळ्या विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट व स्वादिष्ट खाद्यपदार्थ ३० पेक्षा जास्त स्टॉल खाण्यासाठी ठेवले होते. यामध्ये सर्वच कर्मचाऱ्यांनी खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ, अशोक थोरात, आरएमओ डॉ. संतोष शहाणे, मेट्रन रमा गिरी यांच्यासह सर्व कर्मचारी महिला पदाधिकारी यांची उपस्थिती होती. ( छाया ज्ञानोबा वायबसे बीड )

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन मधील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाची औद्योगिक भेट संपन्न

बीड : प्रतिनिधी या बाबतचे सविस्तर वृत्त असे की,सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाने पहिल्यांदाच पुणे या ठिकाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांच्या पुढाकारातून औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते. यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षकीय कर्मचार्यांनी आपला सहभाग नोंदवला त्यांनी पुणे येथे कन्स्ट्रो इंटरनॅशनल एक्झिबिशन ला भेट दिली. व उपाय आणि बांधकाम उद्योगातील क्रांतिकारी कल्पनांचे प्रदर्शन होते.यामध्ये हे प्रदर्शन म्हणजे नवनिर्मितीचे केंद्र होते, ज्यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत विकास




बांधकाम क्षेत्रातील तज्ञ यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. या बरोबरच अभ्यासासोबत आपल्याकडे असलेले पर्यटन स्थळे व त्यांची वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी पवना धरण,आळंदी इत्यादी ठिकाणी ही विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. सदरील औद्योगिक भेटी साठी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले व यशस्वी करण्यासाठी विभागप्रमुख प्रा. नासरे एस. पी, प्रा.सोळंके ए. एस, प्रा.पवार एस. बी,प्रा. यादव पी.एन यांनी परिश्रम घेतले.

# संस्कार प्राथमिकचे चिमुकले रमले वाचनालयात!

बीड : वाचाल तर वाचाल असे म्हटले जाते परंतु वाचनाकडे आज कमालीचे दूर्लक्ष होत असताना संस्कार प्राथमिक विद्यालयाचे इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी वाचनालयास भेट दिली. पुस्तकाच्या खजिन्यात चिमुकले रममाण झाले. हे आशादायक चित्र आज ए एच वाडिया सार्वजनिक वाचनालयात दिसून आले. या बाबत अधिक माहिती अशी की,ए एच वाडिया आहे. संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या पहिली दुसरी विभागाच्या वाचनालय विभाग सहाय्यक ग्रंथपाल किशोर ठोसर आणि निर्गम सहाय्यक अशोक देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या वयोगटास अनुरूप पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यास दिली. थोड्याच वेळात विद्यार्थी वाचनात दंग झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लीलाताई जाधव व ए एच



वाडिया सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष डॉक्टर अनुराग पांगरीकर यांनी सार्वजनिक वाचनालयाने विद्यार्थी भेटीचा प्रमुख श्रीमती विद्या खवले यांनी यास विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विभाग प्रमुख श्रीमती विद्या पारगांवकर, श्री बडे सर विद्यार्थ्यां सोबत अभिनव उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांनी वाचनालयास भेट द्यावी, पुस्तके वाचावीत व त्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी असा त्यामागे उद्देश प्रतिसाद देत इयत्ता दुसरीच्या शंभर विद्यार्थ्यांना ए एच वाडिया सार्वजनिक वाचनालयात नेले. वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे, होते. यापासून प्रेरणा घेत याचे अनुकरण केले तर बंद पडत चाललेली वाचन संस्कृती पुनरूज्जीवीत व्हायला वेळ लागणार नाही.

# अनुसूचित जाती जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण

बीड, दि, ५ :- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नव उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मराठवाडा विभागामध्ये ३२० नव उद्योजकांना निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम(ठएउ्झ ) व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (ठढएउ्झ)प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन विभागीय स्तरावर छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी करण्यात आले आहे.सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये उद्योग संधी, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, लघुउद्योग, सेवा उद्योग, व्यापार उद्योग उद्योगातील विविध टप्पे, उद्योजकीय गुणसंपदा, उद्योगाची जाहिरात, मार्केटिंग, संवाद कौशल्य, प्रकल्प अहवाल, शासकीय कर्ज व अनुदान विषयक योजनांची माहिती, प्रत्यक्ष उद्योगांना भेटी, यशस्वी उद्योजकाचे मार्गदर्शन, उद्योगासाठी लागणारे परवाने, लायसन्स ,इत्यादी विषयावर निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात आली असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या लाभार्थींचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव तयार करण्यात येणार आहेत.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये बीड जिल्ह्यातून २० लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून सदरील प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहे. तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण (ठढएउ्झ)कार्यक्रमांतर्गत १) सीएनसी मशीननिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग) २)डीडी प्रिंटिंग अँड रिव्हर्स इंजीनियरिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग)३) फूड अँड प्रोसेसिंग (अनुसूचित जमाती प्रवर्ग)४)सोलर पीव्ही टेक्निशियन(अनुसूचित जमाती प्रवर्ग) इत्यादी टेक्निकल प्रशिक्षण कोर्स आयोजित करण्यात आले असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १७ मार्च २०२५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ४५ दिवस निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामध्ये संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनासह उद्योजकीय मार्गदर्शन करण्यात येणार आहे सदरील प्रशिक्षणासाठी बीड जिल्ह्यातून प्रत्येक प्रशिक्षणासाठी ५ लाभार्थी याप्रमाणे २० लाभार्थी प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून प्रशिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात येणार आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमांमधून एसटी अनुसूचित जमाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० लाभार्थीसे एकूण २० लाभार्थींची निवड करून पाठवण्यात येणार असून (एस सी )अनुसूचित जाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० लाभार्थी व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० असे एकूण २० लाभार्थींची निवड करून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहेत.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील होतकरू तरुण-तरुणींना प्रशिक्षणाद्वारे उद्योगाच्या क्षेत्रामध्ये स्वतःचे करिअर करण्यासाठी संधी मिळणार आहे. निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ७ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रत्यक्ष मुलाखती द्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १२ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रवेश अर्ज भरलेल्या लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे जिल्हा उद्योग केंद्र संचेती बिल्डिंग गुडलक हॉटेल च्या बाजूला जालना रोड बीड या ठिकाणी निवड करण्यात येणार आहे.

वरील प्रशिक्षण कार्यक्रमाचा बीड जिल्ह्यातील बेरोजगार होतकरू तरुण युवक युवतींनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव बीड व श्री दत्तात्रय क्षीरसागर प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र बीड तसेच सुदाम थोटे विभागीय अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

# कांजुरमार्ग येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा ; पहिल्याच कार्यक्रमास रसिकांचा उस्फूर्त प्रतिसाद !!

मुंबई(पंकजकुमार पाटील): मागील वर्षी केंद्र सरकारकडून आपल्या मायमराठी भाषेवर अभिजात भाषेचे शिक्कामोर्तब झाले. याच मराठी भाषेचा जागर करून मराठी साहित्य, संस्कृतीशी संबंधित कार्यक्रम राज्यात साजरे केले जात असतात. दि. २७ फेब्रुवारी रोजी दरवर्षी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन ङ्गमराठी भाषा गौरव दिनङ्ग म्हणून संपूर्ण राज्यात मोठ्या उत्साहात साजरा होत असतो.

याच दिवसाचे औचित्य साधून विक्रोळी विधानसभा आमदार श्री. सुनिलभाऊ राऊत यांच्या प्रेरणेने आणि सहकार्याने तसेच कोकण मराठी साहित्य परिषद , भांडूप - मुलुंड शाखा आणि संतोष क्लासचे संस्थापक श्री. संतोष पासलकर सर यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गमराठी भाषा दिनङ्ग रविवार दि. २ मार्च २०२५ रोजी सायं. ५.०० वा. नवमहाराष्ट्र व्यायामशाळा, कांजुरमार्ग (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रम स्थळी लावण्यात आलेल्या फलकावर मान्यवर, कार्यक्रमाचे आयोजक, पदाधिकारी तसेच मराठी भाषिक यांनी मराठीत स्वाक्षरी लेखनङ्ग करून या उपक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर प्रमुख मान्यवर यांनी ज्ञानेश्वरी, गाथा व दासबोध हे ग्रंथ हाती घेऊन ते कार्यक्रम स्थळी सन्मानपूर्वक नेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून व मराठी ग्रंथांच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर कु. आराध्या धोंडकर हिने शिववंदना म्हणून दाखवली. तर मराठी गौरव गीत-गौरी मयेकर यांनी सुमधुर आवाजात सादर केले.

कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका व महत्व याबाबतचे प्रास्ताविक आनंद गवस यांनी केले. तसेच कोकण मराठी साहित्य परिषद ,मुलुंड शाखा अध्यक्ष प्रकाश गोठणकर यांनी मराठी साहित्य व साहित्यिकांबद्दल कोमसापची भूमिका तसेच या माध्यमातून कोकणातील कवी लेखक यांना उपलब्ध झालेले व्यासपीठ याबद्दल आपले मत व्यक्त केले. कोमसाप चे सभासद होण्याचे आवाहन यावेळी त्यांनी



केले.त्यानंतर सहभागी कवी व कवीयत्रींनी आपल्या काव्यरचना सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली. त्यांच्या कवितांना उपस्थित रसिकांनी दाद दिली. यावेळी प्रत्येकास पुष्प गुच्छ व पुस्तक भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या काव्यसंमेलनाचे सूत्रसंचालन कोमसापचे मुलुंड कोषाध्यक्ष श्रीकांत म्हात्रे यांनी केले. दरम्यान रुद्र जाधव व ओम शिंदे या शाळकरी मुलांनी छत्रपती शिवरायांवरील पोवाडा आपल्या खणखणीत आवाजात गाऊन उपस्थितांची वाहवा मिळवली.

प्रमुख वक्ते तसेच ज्येष्ठ कवी , साहित्यिक प्राध्यापक श्री. अशोक बागवे सर यांचे व्याख्यान बहारदार झाले. मराठी भाषा गौरव दिवस, मराठी भाषेचे महत्व, मराठी साहित्यिक यांचे योगदान यावर सरांनी आपल्या ओघवत्या शैलीत भाष्य केले. मराठी भाषा जशी रांगडी आहे तसेच ती अमृता इतकी गोड सुद्धा आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेली हि भाषा अभिजातच होती व आहे.

फक्त तिला केंद्राकडून आता अभिजात भाषेचे प्रमाणपत्र मिळाले आहे असे यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले. संवाद साधताना, बोलताना क्लिष्ट, अवघड मराठी शब्दांऐवजी साधे सोपे शब्द वापरल्याने मराठी भाषा खुलून दिसते असेही ते यावेळी म्हणाले.

# करुंगली येथील बापु तुपारेंचा ८३ व्या वर्षी देखील सायकलवरचा थक्क करणारा प्रवास.

करुंगली ता.शिराळा येथील बापु कृष्णा तुपारे वयाच्या ८३ व्या वर्षी देखील सायकलवरुन थंडगार गोळा विकण्याचे काम करीत असुन गेल्या ४७ वर्षापासुन सुरु असलेला त्यांचा दररोजचा तीस पस्तीस किलोमिटर प्रवास थक्क करणारा आहे. ऊन्हाळ्यात विकल्या जार्णाया थंडगार गोळयाला बापुचा गोळा म्हणुन सर्वओळखले जाते.हा व्यवसाय प्रत्येक वर्षी जानेवारी ते मे या पाच महीन्यापर्यंत चालतो.

पुर्वी बापु तुपारे हे शिराळा पश्चीम भागातील चरण,पणुंब्रे,काळुंद्रे,मराठे वाडी,आरळा,सोनवडे,मणदुर,शित्तुर वारुण,डिगेशिराळे या गावात सायकलवरुन प्रवास करत गोळा विकण्याचा व्यवसाय करत होते.परंतु आता वय झाल्यामुळे जवळपासच्याच गावात जावुन गोळा विकण्याचे काम करत आहेत. दारोदारी जाऊन करत असल्याने लहान मुलासह वयोवृध्द लोक सुध्दा त्यांचा थंडगार बापुचा गोळा खरेदी करताना लोक दिसत आहे. त्यांच्या सायकवरील पिपानीचा आवाज ऐकताच लहान मुले बापुचा गोळा...बापुचा गोळा...! म्हणुन ओरडत त्यांच्या सायकल जवळ जमा होऊन थंडगार गोळा खरेदी करताना दिसत आहेत. पुर्वी हा बर्फाचा गोळा लाकडी रंदयावर खिसुन त्यामध्ये लहान काटी टाकुण दोन्ही हाताच्या सहाय्याने गोल आकार देऊन त्यावर गोड रंग टाकुन बनवावा लागत होता.त्यामुळे जास्त वेळ लागायचा.कालांतराने त्यात बापुंनी सुधारणा करुन कागदी द्रोणमध्ये बर्फ खिसुन त्यावर गोड रंगीत कलर घालुन सोबत चमचा देऊन हा गोळा बनवत असल्याने या गोळयाला मागणी वाढताना दिसत आहे.सध्याच्या आधुनिकीकरणाच्या युगामध्ये आलेल्या चोकोबार,कुल्पी, आईसक्रिम,थंड शितपेये यांना फाटा देत बापुंनी आपला व्यवसाय सुरळीत सुरु ठेवला आहे.त्याच्या या गोळयाला लोकांनीही चांगली पसंदी दिली आहे त्यांची वयाच्या ८३ व्या वर्षी देखील व्यवसायाची जिदद व चिकाटी पाहता त्यांचे परीसरातुन कौतुक होताना दिसत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ६ मार्च २०२५
https://lokaarambh.com


## संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या अमृतमहोत्सवी बीज सोहळ्याचे आयोजन

बीड । प्रतिनिधी जगाला शुद्ध भक्तीचा आणि क्रांतीचा संदेश देणारे वारकरी संप्रदायाचे कळस म्हणजे जगद्गुरु संत तुकाराम महाराज आहेत. बीड शहरापासून जवळच असणाऱ्या तळेगाव काकडहिरा दरम्यान असणाऱ्या जगद्गुरु संत श्री तुकोबाराय सेवापीठामध्ये यावर्षी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या अमृतमहोत्सवी बीज सोहळ्याचे दि. ०९ मार्च २०२५ ते १६ मार्च २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. संत श्री तुकोबाराय यांनी दिलेले शब्दधन म्हणजे तुकोबांची अमृतवाणी आजही बीजरूपाने उपलब्ध आहे. पुढील पिढीमध्ये त्या शब्दधनाचे बीजारोपण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुकाराम महाराजांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचे काम या सोहळ्याच्या निमित्ताने होणार आहे. तळेगाव येथील जगद्गुरु तुकोबाराय संत फिट येथील वीज सोहळ्याचे हे चौदावे वर्ष आहे. शेतकरी कष्टकरी तसेच सर्व समाजाचा उद्धार करण्यासाठी संतांनी कार्य केले.



संत विचारांचा जागर करण्यासाठी मागील चौदा वर्षापासून हे काम अविरत चालू आहे. यावर्षी बीज सोहळ्याच्या निमित्ताने पहाटे ४ ते रात्री १२ पर्यंत काकडा, विष्णू सहस्त्रनाम, गाथा पारायण, नामचिंतन, हरिपाठ, कीर्तन, हरिजागर अशा दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि.०९ मार्च पासून ह.भ.प.श्रीमंत महाराज तांदळे, ह.भ.प.माधव महाराज डाके, ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर, ह भ प श्रीकृष्ण महाराज उबाळे, ह भ प भागवत महाराज मोटे, ह भ प प्राचार्य परशुराम महाराज मराडे, ह भ प रामकृष्ण बापू रंधवे यांची रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत हरिकीर्तन सेवा होणार आहेत. दि. ११ मार्च रोजी नगद नारायण महाराज पुण्यतिथी निमित्त सकाळी ११ ते १ या वेळेत भाऊसाहेब महाराज धांडे यांचे विशेष किर्तन होणार आहे. दि. १६ मार्च रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत जगद्गुरु तुकोबाराय विचार प्रबोधीनीचे संस्थापक गाथाप्रेमी ह.भ.प. दत्ता महाराज दोन्हे पाटील लवासा, पुणे यांचे काल्याचे किर्तन होणार

# मुंडेंनी तेव्हाच नैतिकता दाखवायला पाहिजे होती खा.बजरंग सोनवणे यांनी डागली तोफ

केज : संतोष देशमुख यांची क्रुरपणे हत्या करण्यात आली. त्याचवेळी त्यांना मारहाण केलेला एक फोटो समाज माध्यमांमध्ये व्हायरल झाला होता. तेव्हाच मारहाणीच्या खुणा पाहून धनंजय मुंडेंनी नैतिकता दाखवायला पाहिजे होती. आता राजीनामा देण्यास प्रचंड उशीर केला आहे. दरम्यान, या प्रकरणात आरोपींना मदत करणारे व देशमुख कुटुंबियांची दिशाभूल करणाऱ्या पोलीसांना देखील खुनाच्या गुन्ह्यात आरोपी करावे, अशा शब्दात खा.बजरंग सोनवणे यांनी तोफ डागली. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्यावर मारेकऱ्यांनी केलेल्या अत्याचाराचे आणि छळाचे फोटो दि.३ मार्च रोजी रात्री उशीरा प्रसिद्धी माध्यमावर व्हायरल झाले. यानंतर राज्यभरातून संताप दिसू लागलेला आहे. दि.४ मार्च रोजी सकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी मस्साजोग येथे जावून संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि धनंजय देशमुख यांचे सांत्वन केले. पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, या हत्याकांडातील सर्व आरोपींना कठोरात कठोर अशी फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. त्याच बरोबर त्यांना गाड्या, पैसा आणि इतर मदत करण्यामागे जे कोणी असतील त्यांना देखील शिक्षा व्हायला हवी. संतोष देशमुख यांचा छळ करून जीवे मारल्याची सर्व पुरावे व फोटो उपलब्ध असताना देखील सरकारने तीन महिने धनंजय मुंडेना वाचविले. त्यावेळी देखील मारहाणीचा एक फोटो व्हायरल झाला होता. त्याचवेळी नैतिकता




दाखवून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहीजे होता. देशमुख हत्येच्या कटात कांही पोलीस सुद्धा सहभागी असून आतापर्यंत पोलिसांनी या बाबत एकही पत्रकार परिषद का घेतली नाही? वाल्मीक कराडला अटकेत असताना एवढ्या सुविधा कशा पुरविल्या जातात ? जमावबंदी असताना वाल्मीक कराड याच्या समर्थनासाठी पोलीस ठाण्याच्या दारात शेकडोंच्या संख्येत प्रतिमोर्चे कसे निघतात? खंडणीचे व ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करू नका म्हणून पोलीस निरीक्षक प्रशांत महाजनला कुणा कुणाचे फोन आले? धनंजय मुंडे यांनी फोटो पाहून व्यथीत होऊन आणि वैद्यकिय कारणाने राजीनामा दिला? त्या कारणांपैकी नेमके कोणते कारण आहे, हे मात्र त्यांनाच माहीत, असा टोला देखील त्यांनी लगावला.


# आमदार प्रिमिअम लीगक्रिकेट स्पर्धेचा युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शुभारंभ

लातूर-
भारतीय जनता पार्टी समसापूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रिमिअम क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते रेणापूर तालुक्यातील मौजे समसापूर येथे मंगळवारी दुपारी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झाले.
या क्रिकेट स्पर्धेत रेणापूर तालुक्यातील जवळपास आठ संघाने सहभाग घेतला असून यशस्वी संघांना प्रत्येकी प्रथम ५१ हजार, द्वितीय ३१ हजार, तृतीय २१ हजार आणि चतुर्थ ११ हजार रुपये व इतर वैयक्तिक पारितोषिक देण्यात येणार आहेत. सदरील स्पर्धे



चा शुभारंभ समसापूर येथे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, भाजपाचे महादेव घुले, लिंबराज चव्हाण, विजय चव्हाण, मदन चौधरी, डॉ. परमेश्वर जाधव, नरेश चपटे, उत्तम चव्हाण, वसंत फुलसे, मच्छिंद्र चक्रे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचे स्वागत स्पर्धा संयोजन समितीचे युवराज मुरकुटे, खंडू शिंदे, गौतम अंधारे, विजय मुरकुटे, राम पडवळ, ईश्वर घोडके, पंकज काळे यांच्यासह अनेकांनी केले. उद्घाटन समारंभास विविध संघातील खेळाडू सह क्रिकेट प्रेमी तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठमोळं मुलुंडतर्फे महिला दिनानिमित्त खुमासदार कार्यक्रम




मुंबई( पंकजकुमार पाटील): मराठमोळं मुलुंड च्या वतीने ङ्ग महिला दिनानिमित्त ङ्ग एका खुमासदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम शनिवार, दिनांक १५ मार्च रोजी संध्याकाळी ५ वाजता जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, चिंतामणराव देशमुख उद्यानाजवळ ,मुलुंड (पूर्व), मुंबई येथे होणार आहे.

यामध्ये नामवंत लेखकांच्या हलक्या फुलक्या तसेच विनोदी कथांचा रंजक आविष्कार ङ्गकथामंजिरीङ्ग हा कार्यक्रम सौ मंजिरी देवरस सादर करणार आहेत. तसेच यावेळी सर्व वयोगटातील महिलांसाठी मनोरंजनात्मक खेळसुद्धा ठेवण्यात आले आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य असून सर्व स्त्री-पुरुषांना आग्रहाचे आमंत्रण आयोजकांमार्फत देण्यात आले आहे.

# हिवरा संगम टीबी मुक्त घोषित

महागाव प्रतिनिधी
राष्ट्रीय क्ष्यरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत प्राथमिक उपकेंद्र हिवरा पी.एच.सी पोहडूळ अंतर्गत येणारे उपक्रम शील असणारे हिवरा संगम हे गाव टीबी मुक्त गाव घोषित करण्यात आले आहे काल मंगळवार ४ मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालय हिवरा येथील सरपंच सौ. मेघाताई



बोरुळकर, कार्यसम्राट उपसरपंच शरद पाटील कदम, ग्रामविकास अधिकारी विजय सावळकर, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सचिन नागपुरे, आरोग्य सेवक अवधूत पुंडे, आरोग्य सेविका आफ्रीन शेख, आशा सेविका दर्शना कांबळे इत्यादींची समिती स्थापन करण्यात आली आहे.

# दिघी येथे जिज्ञासा अभ्यासिकाचे उद्घाटन कामगार नेते सचिन लांडगे व मा महापौर नितीन काळजे यांच्या हस्ते संपन्न - पांडुरंग आवारे-पाटील

भोसरी-दिघी(प्रतिनिधी) दि.५ मार्च २०२५ रोजी युवा उद्योजक श्री.लक्ष्मण पाचर्णे पाटील यांच्या जिज्ञासा अभ्यासिकाचे दिघी येथे पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचे मा महापौर श्री.नितीन आप्पा काळजे व भोसरी विधान सभेचे आमदार पै.महेश दादा लांडगे यांचे मोठ्ये बंधु कामगार नेते श्री.सचिन भैय्या लांडगे यांच्या शुभ हस्ते उद्घाटन शुभारंभ संपन्न झाले याप्रसंगी प्रमुख उपस्थिती शिवसंग्राम संपर्कप्रमुख पिंपरी-चिंचवड शहर पुणे.श्री.पांडुरंग आवारे-पाटील, नगरसेविका सौ.निर्मलाताई गायकवाड, शिवसेना उपशहर



अध्यक्ष श्री.कुणाल शेठ तापकीर, उद्योजक श्री.आकाश डोंगरे, श्री उदय गायकवाड(अध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा भोसरी चरोली मंडळ),चंद्रकांत वाळके मा नगरसेवक,कुलदीप परांडे(भाजपा पिंपरी-चिंचवड शहर सरचिटणीस),सौरभ ढोकले (राज्य कर निरीक्षक),पै.एकनाथ सोनवणे,वैभव ढोकले उद्योजक,संजय भाऊ गायकवाड (शिवाई नागरी पतसंस्था),तात्यासाहेब लांडे (सरपंच),पै.राज सोनवणे, विनोद रेंडे पाटील,केशव वाघमारे (रा.कॉ पिं-चिं शहर प्रवक्ता),उद्योजक चंद्रकांत वाघमारे,समाधान बोरकर व अन्य विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्य संकेत उपस्थित होते.

जिज्ञासा अभ्यासिका मध्ये महत्त्वाचे वैशिष्ट्ये पिण्यासाठी मिनरल वॉटरची सोय,प्रशस्त २.५ फुटी कंपार्टमेंट, स्वतंत्र मोबाईल / लॅपटॉप चार्जिंग पॉईंट, वर्तमानपत्र वाचण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था, मुला / मुलींसाठी स्वतंत्र बाथरूमची सोय, टू व्हीलर साठी प्रशस्त पार्किंग व्यवस्था, प्रशस्त लॉकरची सुविधा, २४ तास लाईटची सोय (इन्व्हर्टर सुविधा),शांत व सुसज्ज वातावरण, ऋछएए थश्रत्रऋ सुविधा उपलब्ध आहेत. जिज्ञासा अभ्यासिका च्या उद्घाटन शुभारंभासाठी आलेल्या सर्वांचे आभार श्री.लक्ष्मण पाचर्णे यांनी मानले.

# महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबल्या

नवी दिल्ली । वृतसंस्था राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रकरणाची सुनावणी मंगळवारी (दि.४) सर्वोच्च न्यायालयात काही मिनीटे पार पडली. मात्र, दोन्ही बाजूंना आपले म्हणणे स्पष्टपणे न मांडता आल्यामुळे न्यायालयाने संताप व्यक्त केला. आणि पुन्हा एकदा ही सुनावणी लांबणीवर पडली. या प्रकरणाची सुनावणी आता कधी होणार, हे अद्याप अस्पष्ट आहे. मंगळवारी पार पडलेल्या सुनावणीत सुरूवातीलाच सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी राज्य सरकारच्या वतीने न्यायालयाला दोन दिवसांचा वेळ मागितला होता. याचिकाकर्त्यांनी या गोष्टीचा विरोध केला. यावर न्यायालयाने दोन्ही बाजूंना या प्रकरणासंबंधी विचारणा केली. न्यायालयाने केलेल्या विचारणेसंदर्भात दोन्ही बाजू न्यायालयाला समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत. दोन्ही बाजूंची भूमिका होती की, आम्हाला निवडणुका पाहिजेत. मात्र, त्यात काहीसा गोंधळ होता. त्यावर न्यायालयाने संताप व्यक्त केला आणि या संदर्भातील सर्व कागदपत्रे मागवली. हे प्रकरण आता पुढच्या सुनावणीत ऐकले जाईल. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा लांबणीवर पडले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाला होळीच्या निमित्ताने ९ मार्च ते १६ मार्च दरम्यान सुट्ट्या आहेत. ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com